Government Of Maharashtra



**Area 2a: Single Window**

**16:** Delegate the required decision-making powers to the single window body/ bureau to grant all required approvals/ clearances

**Response:** **Yes**

**Remarks:**

The Maharashtra Single Window model is a hybrid model that combines the best features of the online and the physical Single Window models prevalent in the country.

As per the Maharashtra Single Window GR (MIM 2015/PK 105 / Udyog8), MAITRI has been delegated decision making powers for grant of about 44 approvals across 16 departments required for setting up a business in the state.

About 16 officers of concerned department work as a nodal officer in MAITRI.

Development Commissioner (Industries) has been designated as the Chairman of MAITRI, while the Principal Secretary (Industries) supervise and guide the functioning of MAITRI.

Chairman MAITRI is the ultimate authority to take decision on issuance of the license / permission based on the merit of the case.

The resolution provides power of various committees/boards/regulating authorities constituted for granting permissions to the **MAITRI Nodal officer** on behalf of Chairman, MAITRI.

As per the resolution, Government may delegate power to MAITRI as and when required by issuing orders. The powers given to MAITRI continue to be in force till the operative period of the unit.

## Functioning of MAITRI – Single Window

| | |
|---|---|
| Step 1 | Investor registers on the MAITRI portal and fills the common application form based on which a unique registration ID is allotted |
| Step 2 | As per the type of Industry and Location of the Industry, Investor apply for relevant approvals through the MAITRI single Window |
| Step 3 | Applications received online are transferred (by email / by post ) to the concerned department by the MAITRI |
| Step 4 | Concerned departments need to process the application within the prescribed time limit as per the Right to Public Service Act, 2015 |
| Step 5 | In case the respective department fail to grant the permission in the prescribed time limit, the application is transferred to the Nodal officer of MAITRI as a first appellate authority |
| Step 6 | The Nodal officer need to process the application and take the decision within prescribed time limit |
| Step 7 | In case further delay happens in giving permission/license at nodal officer level, the Chairman MAITRI take decision for issuing permission/license as per the merit of the case |

**Supporting Documents –**Single Window Policy, MAITRI Government Resolution

Please find annexed relevant screenshots of the Single Window Policy and MAITRI Government Resolution:

**1. Single Window Policy**
(https://maitri.mahaonline.gov.in/PDF/Single_Window_Policy_2016.pdf)

As envisaged in the Industrial Policy 2013, the State Government has set up an Investor Facilitation Cell under the aegis of Industries Department on 27th February 2014 in Mumbai. The Investor Facilitation Cell has been officially named as Maharashtra Industry, Trade and Investor Facilitation Cell. (MAITRI). Nodal Officers from various departments have been appointed for the MAITRI to facilitate investment proposals. It is now envisaged that 'Single Window Scheme' will be implemented through MAITRI platform.

**Government Resolution :**
**The Government has decided to strengthen the MAITRI platform for giving facilitation services to industries for obtaining permissions/licences /NCOs at one place for setting up a Unit in the State.**

**Scope and Responsibilities of MAITRI :**

MAITRI has been entrusted the responsibility to enable smooth transition of projects from the proposal stage up to the implementation stage with the objectives as below :

**To provide all clearances at one place to the investors.**

**To give online and time-bound approvals.**

**To work as a grievance redressal mechanism for industries.**




At present MAITRI platform is working as an information centre and grievance redressal mechanism for industries. The further scope of MAITRI has been expanded to improve India's overall ranking in the World Bank Ease of Doing Business Report and for success of the 'Make in Maharashtra' and also to achieve the above objectives.

6. At present, the departments have delegated power to grant permissions/licenses to various levels of officers depending on investment, product, land etc. Henceforth the power of head of the office will be given to Nodal Officer of respective departments at MAITRI.

The powers of various Committees/Boards/Regulating Authorities constituted for granting permissions will be transferred to Nodal Officers on behalf of Chairman, MAITRI. Accordingly, all the departments shall modify /amend their rules / GRs / Act, etc.

7. Govt. may delegate powers to MAITRI as and when required by issuing the orders. The powers given to MAITRI will continue to be in force till the operative period of the unit.

## How MAITRI will Function:

The New Model of MAITRI will speed up the industrial development and help to achieve objectives of 'Make in Maharashtra' and in turn ensure success of 'Make in India' initiative.



1. Entrepreneur shall apply for all the permissions required to set up a unit in a single online form to Single Window. Entrepreneur can also apply for permissions/NOCs/licenses required to the concerned department.

2. MAITRI will provide prescribed format of the concerned departments for their permissions/NOCs/licenses. The entrepreneur shall apply online. Application received online will be forwarded to the concerned department by MAITRI. The applications will be forwarded by post where online service is not available for immediate action.

3. The Online Wallet will be provided by Mahaonline to pay the prescribed fees for processing the application & the fee will be deposited to concerned department accordingly.

4. Concerned department should take a decision on the application within the prescribed time under Maharashtra Right to Public Services Ordinance, 2015. Once they receive application from MAITRI either in online format or in manual format, time count for the services will commence.

5. MAITRI will take the assistance of the offices of the concerned departments where field inspection is necessary before issue of permissions/NOCs/licenses.

6. Single Window Scheme is implemented in the State on the basis of level of investment of project.

7. The Development Commissioner (Industries) will be Chairman of the MAITRI Cell and the Principal Secretary (Industries) will supervise and guide the functioning of MAITRI.

8. This resolution provides power to the nodal officers of the concerned departments at MAITRI to grant permissions/NOCs/licenses, if such permissions/NOCs/licenses are not issued within the prescribed time under Right to Public Service notification by the concerned departments.

9. The concerned departments will not issue separate orders for the appointment of the nodal officers. The officers shall join the MAITRI Cell within a week's time after issue of orders by the Government.

2**. Single Window GR**

https://www.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%20Resolutions/English/201602111743141610.pdf

उद्योगांना सर्व मंजुऱ्या एकाच ठिकाणी देण्यासाठी एक खिडकी योजना राबविणे - "मैत्री कक्ष" सक्षम करणे.

महाराष्ट्र शासन
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई.
शासन निर्णय क्रमांक मेइम २०१५/ प्र.क्र. १०५/ उद्योग-८
दिनांक - ११ फेब्रुवारी, २०१६

**संदर्भ:-**

१) शासन निर्णय उद्योग विभाग क्र. ई-बीझ-२०१३/प्र.क्र. ११७/उद्योग-८, दि. ०१/०३/२०१४.
२) शासन निर्णय उद्योग विभाग क्र. मेइम-२०१४/प्र.क्र. ८८/उद्योग-८, दि. ०८/०१/२०१५.
3) शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग दिनांक - २१/०८/२०१५.
४) केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्रालय पत्र क्र. अर्धशासकीय पत्र क्र. १०(४५)/२०१५-BE.I, दि. ०१/१०/२०१५

**प्रस्तावना-**

केंद्र शासनाने दि. २९ डिसेंबर, २०१४ रोजी "मेक इन इंडिया" या विषयावर आयोजित केलेल्या एका राष्ट्रीय कार्यशाळेत "व्यवसाय करणे सोपे" Ease of doing Business करण्यासाठी राज्याला घालून दिलेल्या मुदतीत अंमलबजावणी करण्याकरीता ९८ शिफारशी केल्या होत्या. "व्यवसाय करणे सोपे" करण्याच्या संबंधात जागतिक बँकेने केलेल्या सर्वेक्षण अहवाल सन २०१५-१६ मध्ये जागतिक स्तरावर देशाच्या क्रमवारीत भारताचा क्रमांक १३० वर असून या क्रमवारीत पहिल्या ५० मध्ये भारताचा क्रमांक यावा म्हणून, मा.पंतप्रधानांनी आवश्यक ते सर्व उपाय योजण्यावर भर दिला आहे. केंद्र शासनाच्या व्यापार व वाणिज्य मंत्रालयाने या संबंधात केलेल्या शिफारशींपैकी, राज्यात उद्योग उभारण्यासाठी आवश्यक मंजुऱ्या मिळवून देण्याकरीता एक खिडकी योजनेची अंमलबजावणी करणे, ही एक महत्वाची शिफारस आहे. त्यास अनुसरुन मुख्य सचिवांनी राज्यात एक खिडकी योजना राबविणे बाबत "मेक इन इंडीया" कार्यशाळेत उपस्थित मान्यवरांना आश्वासित केले आहे. मा.मुख्यमंत्री तसेच मा.मुख्यसचिव यांचे स्तरावर "मेक इन इंडीया" आणि "मेक इन महाराष्ट्र" यांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात येत आहे.

जागतिक बँकेच्या व्यवसाय करणे सोपे करण्यासंबंधीच्या अहवालातील एकूण क्रमवारीत भारताचा क्रमांक वर यावा आणि "मेक इन महाराष्ट्र" या उपक्रम यशस्वी व्हावा म्हणून संबंधित उद्योग स्थापण्यासाठी आवश्यक विविध यंत्रणांकडून ना हरकते व परवाने यांच्या प्रक्रीया/ टप्पे व त्यास लागणारा कालावधी कमी करणे अपेक्षित आहे. "एक खिडकी योजना" परिणामकारकपणे राबविल्यास हा उद्देश साध्य करता येईल.

शासन निर्णय क्रमांकः मैइन २०१५/ प्र.क्र. १०५/ उद्योग-८

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | उद्योग विभाग | १. महाराष्ट्र कुळ व शेत जमीन अधिनियम अंतर्गत मंजूरी<br>२. माहिती तंत्रज्ञान/ जैव तंत्रज्ञान उद्याने यांना हेतूपत्र मंजूर करणे<br>३. मुद्रांक शुल्क माफीची प्रकरणांना मंजूरी | अधिक्षक उद्योग अधिकारी |
| १४ | अन्न व नागरी पुरवठा | १. वजने मापे नियम २०११ अंतर्गत नोंदणी (packaged commodities)<br>२. वजने व मापे मंजूरी | सहाय्यक नियंत्रक वजने व मापे |
| १५ | विधी व न्याय विभाग | १. भागिदारी अधिनियम १९३२ अंतर्गत घटकांची नोंदणी | उप निबंधक भागीदारी संस्था |
| १६ | सार्वजनिक बांधकाम व रस्ते विकास महामंडळ | १. उद्योग घटकांसाठी मुलभूत सुविधा जसे वीज, पाणी जोडणी, रस्ता खोदणे, मुख्य रस्त्यांना जोड रस्ते इ.करीता वहीवाट हक्क | अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग |

प्रकरणपरत्वे आवश्यकतेनुसार प्रधान सचिव (उद्योग) यांच्या परवानगीने मैत्रीमार्फत लोकसेवा हक्क अधिनियमा अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सेवांमध्ये वाढ करण्यात येईल.

**४.मैत्री कक्षाचे कर्तव्य व जबाबदाऱ्या :-**

१) मैत्री कक्षामार्फत उद्योगांना शासनाच्या विभागनिहाय पुरविण्यात येणाऱ्या सेवा परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद केल्या आहेत.

२) विषयांकित सेवा संबंधित विभागांनी लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत अधिसूचित कराव्यात तसेच राज्य लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत या सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी संबंधित विभागाने /यंत्रणेने निश्चित कालावधी विहित करावेत.

३) विविध विभागांचे अधिकारी मैत्रीचे नोडल अधिकारी म्हणून पूर्ण वेळ काम पहातील.

४) राज्य सेवा हक्क अधिनियमांतर्गत विहित कालावधीत घटकास परवानगी / परवाना देणे आवश्यक असून त्याची जबाबदारी संबंधित विभागातील पद निर्देशित अधिकाऱ्यांची राहील.

५) मैत्री कक्षा मार्फत प्राप्त झालेल्या निवेदन व अर्जान्वये उद्योगांसाठी ज्या परवाने / ना हरकती मिळण्याबाबत विनंती केली आहे. सदर अर्ज टपालाद्वारे/ऑनलाईन रित्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येतील. सदर विभागाने राज्य लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत विहित कालावधीत परवान्यासंदर्भात निर्णय न दिल्यास सदर अर्जाच्या बाबत उपरोक्त सेवा संबंधित विभागाच्या अपिलीय अधिकारी यांचेकडे न रहाता मैत्री कक्षातील संबधित नोडल

अधिकारी यांच्याकडे प्राधिकार रहातील. थोडक्यात मैत्री कक्षाकडे प्राप्त प्रकरणांमध्ये राज्य लोकसेवा हक्क अधिनियमाअंतर्गत अंतर्भुत असलेले प्रथम व द्वितीय अपीलीय अधिकारी अनुक्रमे मैत्री कक्षातील नोडल अधिकारी व अध्यक्ष मैत्री हे राहतील या आशयाची दुरुस्ती संबंधित विभागाने लोकसेवा हक्क अधिनियम मध्ये पुरविण्यात येणा-या सेवा तपशिलामध्ये करावा.

६) मैत्री कक्षाकडे प्राप्त प्रकरणांबाबत संबंधीत विभागाकडून राज्य लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत विहित कालमर्यादेत परवानगी/परवाना/नाहरकत बाबत निर्णय घेतला नाही तर मैत्री कक्षाकडून पाठविलेले अर्ज विहित कालमर्यादा पूर्ण होताच मैत्री कक्षाकडे वर्ग करण्यात येतील आणि त्यानंतर अशा अर्जावर मैत्री कक्षामध्ये नामनिर्देशित केलेल्या नोडल अधिका-यामार्फत प्रथम अपिलात संबंधित प्राधिकृत अधिका-यास विहित कालावधीत कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात येतील. त्या कालावधीत देखिल कार्यवाही न झाल्यास अध्यक्ष, मैत्री कक्ष हे प्रकरण निहाय निर्णय घेउन अर्जदारास परवानगी/परवाना देतील.

७) सदर विभागाच्या विभाग प्रमुखांच्या वतीने त्यांच्या विभागांचे परवान्याशी निगडीत अधिनियम/शासन निर्णय / नियमावली / अधिकारांचे विकेंद्रीकरण करून त्यानुसार प्रकल्पाची गुंतवणूक/उत्पादन/जागा इत्यादीच्या आधारे परवाने मंजुरीचे अधिकार विविध अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत. "मैत्री" कक्षाअंतर्गत समन्वय अधिकाऱ्यांना (Nodal Officer) संबंधीत विभागप्रमुखांचे अधिकार प्रदान करण्यात येतील . याबाबत संबधित विभागाने प्रकरण परत्वे नियम /अधिनियम मध्ये सुधारणा करावी.

८) राज्यशासन, आवश्यक वाटल्यास संबंधित संस्थांकडे असलेले अधिकार वगळून अन्य अधिकार, "मैत्री" कक्षाला उचित अधिसूचनेद्वारे हस्तांतरीत करील. "मैत्री" कक्षाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा कालावधी प्रकल्पाचे उत्पादन ते कार्यकालावधीच्या टप्प्यापर्यंत राहील.

**५. मैत्री कक्षातील कामकाजाची पध्दती :-**

"मैत्री" कक्षाच्या सुधारीत मॉडेलमुळे राज्याची अर्थिक प्रगती गतिमान होऊन विकासाला चालना मिळेल त्याद्वारे "मेक इन महाराष्ट्र" च्या माध्यमातून "मेक इन इंडीया" चा देखील उद्दिष्ट साध्य होणार आहे.

१) "मेक इन महाराष्ट्र" अंतर्गत उद्योजकांनी उद्योग स्थापन करण्यासाठी हव्या असणाऱ्या ना-हरकती /परवाने /मंजुऱ्यां करीता केवळ एकाच ठिकाणी म्हणजेच "एक खिडकी योजने"

कडे संयुक्त ऑनलाईन अर्ज करावयाचा आहे. उद्योग स्थापण्याच्या हेतूने आवश्यक असणा-या सेवांकरिता उद्योजक मूळ विभागाकडे देखील अर्ज करू शकेल.

२) मैत्री कक्षामार्फत पुरविण्यात येणा-या सर्व सेवांसाठी विविध विभागनिहाय अर्जाचा नमुना उपलब्ध करण्यात येईल व अर्जदाराने संगणकीय प्रणालीवर अर्ज करणे आवश्यक आहे. मैत्री कक्षात अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदरचा अर्ज ज्या विभागात ऑनलाइर्न सेवा उपलब्ध आहेत त्या विभागाला संगणकप्रणालीद्वारे अर्ज संबंधीत विभागांना पाठविण्यात येईल. तसेच ज्या विभागांमध्ये ऑनलाईन सुविधा उपलब्ध नाही अशा विभागांना टपालाद्वारे सदर अर्ज तात्काळ कार्यवाही साठी पाठविण्यात येतील.

३) उद्योगांना जे परवाने प्राप्त करण्यासाठी छाननी / प्रक्रीया शुल्क आकारण्यात येते त्यासाठी महाऑनलाईनद्वारे विहित शुल्क भरणेसाठी संगणक प्रणाली ( Online wallet ) उपलब्ध करुन देण्यात येईल व त्याप्रमाणे विहित शुल्क संबंधित विभागांकडे जमा करण्यात येईल.

४) राज्य सेवा हक्क अधिनियमांतर्गत नमूद विहित कालावधी मध्ये संबंधित विभागांनी प्राप्त प्रकरणांवर निर्णय घ्यावयाचा आहे व त्याअनुषंगाने मैत्री मार्फत विभागांना अर्ज पाठविल्यानंतर त्याचा पाठपुरावा (Application Tracking) सुरु करण्यात येईल.

५) ज्या उद्योगांना काही विभागांचे परवाने मंजूर करण्यापूर्वी क्षेत्रीय तपासणी अहवाल घेणे आवश्यक असते अशा उद्योगांच्या प्रकरणी मैत्री कक्षातर्फे संबंधित विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाचे सहकार्य घेण्यात येईल.

६) एक खिडकी योजना ही प्रकल्पाच्या गुंतवणूक रकमेच्या अनुषंगाने राज्य स्तरावर राबविण्यात येणार आहे व त्याची गुंतवणूक मर्यादा आवश्यकतेनुसार ठरविण्यात येईल.

७) विकास आयुक्त (उद्योग) हे "एक खिडकी योजने"- "मैत्री कक्षा" चे अध्यक्ष राहतील. तसेच सदर कक्ष प्रधान सचिव (उद्योग) यांच्या संनियंत्रण व मार्गदर्शनाखाली कार्यरत राहील.

८) प्रशासकीय विभागाने संबधित परवाने /नाहरकती /मंजु-या जर राज्य सेवा हक्क अधिनियमातील विहित कालमर्यादित मंजूर केले नाहीत तर असे मंजूरीचे प्राधिकार "मैत्री" कक्षाअंतर्गत नियुक्त संबधित विभागाच्या नोडल अधिका-यांना मान्यता देण्याचे प्राधिकार या शासन निर्णयाद्वारे देण्यात येत आहेत.

९) प्रस्तुत शासन निर्णय निर्गमित केल्यानंतर अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबत विभागांनी स्वतंत्र आदेश काढण्याची आवश्यकता राहणार नाही. मैत्री कक्षात नियुक्तीबाबत आदेश